॥ ऋणानुबंधाच्या ॥

गायिकाः वाणी जयराम
गायकः कुमार गंधर्व
गीतः बाळ कोल्हटकर
संगीतः वसंत देसाई
नाटकः देव दीनाघरीं धांवला

ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गांठी।
भेटीत रूष्टता मोठी ॥ धृ. ॥

त्या कातरवेळा थरथरती कधीं अधरीं।
त्या तिन्हीसांजा त्या आठवणी त्या प्रहरी॥
कितिदां आलों, गेलों, जमलों

रुसण्यावांचुनि परस्परांच्या कधीं न घडल्या गोष्टी।
भेटीत रूष्टता मोठी ॥ १ ॥

कधीं तिने मनोरम रुसणें। रुसण्यांत उगीच ते हंसणें॥
म्हणून तें मनोहर रुसणें।
हसणे, रुसणें, रुसणें हसणे ॥

हंसण्यावरती रुसण्यासाठी, जन्मजन्मींच्या गांठी ॥
भेटीत रूष्टता मोठी ॥ २ ॥

कधी जवळ सुखाने बसलों।
दुःखांत सुखाला हंसलों।
कधीं गहिंवरलों, कधीं धुसफुसुलों,

सागरतीरीं आठवणींनीं, वाळूंत मारल्या रेघा।
जन्मासाठीं जन्म जन्मलों। जन्मांत जन्मली न गट्टी।
भेटीत रूष्टता मोठी ॥ ३ ॥